## निरुपण

मन आगळे जनात, मन वेगळे मनात ।
दुहेरी वागण्याचे, पेव फुले ॥

शब्द मधाळ सामोरी, शब्द जहाल माघारी ।
खरी बोलण्याचे, वेड खुळे ॥

यांचा खेळ हा फ़सवा, यांचा मेळ हो बसवा ।
कष्टं दुसर्‍याचे, कोण झुरे ?

मुकी झाली आहे भाषा, मुकी वेदना-निराशा ।
काय सांगण्याचे, जगी उरे

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**